(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

(१९६०) २ एस . सी. आर. ५१५

केकी बेजॉन्जी आणि इतर एक

विरुद्ध

मुंबई राज्य

( न्यायमूर्ती जाफर इमाम, के. सुब्बाराव आणि रघूबर दयाल )

फौजदारी खटला-शोध-वस्तूंची जप्ती - जप्त केलेल्या वस्तूंची सर्व माहिती नाकारणे- जप्त केलेल्या वस्तूंबद्दल कोणतेही प्रश्न उपस्थित केले गेले नाही --- आरोपी, जर पूर्वग्रहदूषित असेल तर- गृहित धरणे - मालकाच्या आवारात नोकर - मालकाच्या वस्तू ताब्यात आहेत अथवा नाहीत - फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ - (५/१८९८) , मुंबई प्रतिबंध कायदा , १९४९ (मुंबई २५/१९४९) चे कलम ३४२ - सह कलम ६५ (ब ), ६५ (फ), ६६ (ब) .

अपीलकर्ता क्रमांक १ च्या आवारात घेतलेल्या झडतीदरम्यान पूर्णतः सक्रिय दारू भट्टी आढळून आली जी अपीलकर्ता क्रमांक १ आणि त्याचा नोकर, अपीलकर्ता क्रमांक २ हे चालवीत होते. इलाखा शहर दंडाधिकारी हे समाधानी होते की एक सक्रिय दारूभट्टी आणि अवैध दारू सापडली आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४२ अंतर्गत अपीलकर्ता क्रमांक १ ला तपासण्यात आले. त्याने स्वेच्छेने असे विधान केले की त्याला पोलिसांनी जप्त केलेल्या निषिद्ध पदार्थाबद्दल काहीही माहिती नाही; त्यामुळे त्याच्या आवारातून जप्त केलेल्या वस्तू आणि दारूभट्टीबद्दल इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांनी कोणतेही विशिष्ट प्रश्न विचारले नाही, ज्यांनी मुंबई प्रतिबंध कायद्याच्या उप कलम ६५ (ब), ६५ (फ) आणि ६६ (बी) अंतर्गत भट्टी व अवैध दारूच्या जप्तीच्या तथ्यांवर विसंबून अपीलकर्त्यांना दोषी ठरवले आणि कलम १०३ च्या अनुमानाच्या तरतुदीचा अपीलकर्त्याविरुद्ध वापर केला नाही .

विशेष परवानगीद्वारे अपील केल्यावर अपीलकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की, (१) कायद्याच्या कलम १०३ अन्वये कोणतेही अनुमान उद्भवले नाही; आणि कायद्याच्या कलम १०३ अन्वये अनुमान नाकारण्याची संधी त्यांना नाकारण्यात आली होती, कारण फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४२ अन्वये त्यांची तपासणी केली गेली तेव्हा त्यांना कोणतेही प्रश्न विचारले गेले नव्हते, आणि

दंडाधिकाऱ्यांनी कलम १०३ मधील अपीलकर्त्यांविरुद्ध अनुमानाची तरतूद वापरली नसल्यामुळे उच्च न्यायालयाने अपीलकर्त्यांना, याचे खंडन करण्याची संधी न देता, कलम १०३ अन्वये उद्भवलेल्या अनुमानावर त्यांना दोषी ठरवायला नको होते.

अपीलकर्ता क्रमांक २ च्या वतीने पुढे असे सांगण्यात आले कि तो या अपीलकर्ता क्रमांक १ चा तो केवळ नोकर होता. जर कुणाच्या ताब्यात दारूभट्टी होती तर ती अपीलकर्ता क्रमांक १ च्या ताब्यात होती आणि अधिनियमाच्या कलम १०३ अंतर्गत त्याच्या विरोधात कोणतेही अनुमान उदभवू शकत नाही.

असे मानले जाते की, जेव्हा एखाद्या आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४२ अंतर्गत तपासले जाते आणि तो त्याच्याजवळून जप्त केलेल्या वस्तूंबद्दल सर्व माहिती नाकारणारे विधान स्वेच्छेने करतो,आणि त्याच्या परिसरात सापडलेल्या वस्तुंच्या ताब्याबद्दल त्याला पुढील प्रश्न विचारले विचारले गेले नाहीत तर त्याच्याबद्दल कोणताही पूर्वग्रह निर्माण होत नाही .

मुंबई प्रतिबंध कायद्याच्या कलम १०३ अन्वये असे अनुमान निघते कि या कायद्याअंतर्गत गुन्हा घडल्याचे तेव्हाच मानण्यात येते जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या ताब्यात अधिकच्या पुराव्याअभावी मादक पदार्थांच्या निर्मितीसाठी लागणारी भट्टी, भांडी, अवजारे व उपकरणे सापडली आहेत आणि जोपर्यंत ह्याच्याविरुद्ध काही सिद्ध होत नाही. अशा पद्धतीने , अपीलकर्ता नं १ पूर्वग्रहदूषित होणार नाही जेव्हा कायद्याच्या कलम ६५ (एफ) परत्वे त्याची दोषसिद्धी मान्य करण्यासाठी, उच्च न्यायालय कायद्याच्या कलम १०३ अन्वये असणाऱ्या अनुमानावर विसंबून असेल .

पुढे असेही मानण्यात आले आहे कि परिसरातील एखाद्या कर्मचाऱ्याच्या ताब्यात त्याच्या मालकाच्या मालकीच्या वस्तू जर त्याच्या ताब्यात दिल्या नसतील तर, प्रत्यक्ष त्याच्या ताब्यात सापडल्या असे म्हणता येणार नाही.

मुंबई प्रतिबंध कायद्याच्या कलम ६५ (एफ) अन्वये एखादा गुन्हा जर वाजवी संशयाच्या पलीकडे स्थापित केला गेला नसेल आणि दारूभट्टीचा ताबा बाळगणे जर सदर कायद्याच्या कलमान्वये गुन्हा होत नसेल तर अशी व्यक्ती जिच्या ताब्यात दारूभट्टी आहे व त्याबद्दल तो

समाधानकारक उत्तरे देऊ शकला नाही तर कायद्याच्या कलम १०३ अन्वये त्याच्याविरुद्ध कोणतेही अनुमान निघू शंकत नाही .

सदर प्रकरणात भट्टी हि मालकाच्या ताब्यात असल्यामुळे व कर्मचाऱ्याने कोणत्याही मार्गाने मालकाला भट्टी ताब्यात घेण्यास मदत केली याचा पुरावा नसल्यामुळे असे म्हटले जाऊ शकत नाही कि अपीलकर्ता क्रमांक २ चा भट्टीवर अशा प्रकारे ताबा होता कि ज्या अन्वये तो कलम ६५ (फ) अंतर्गत गुन्हा ठरेल.

फौजदारी अपिलीय अधिकारक्षेत्र : फौजदारी अपील क्रमांक १२४ / १९५९

इलाखा शहर दंडाधिकारी , न्यायालय, मझगाव, मुंबई यांच्या १७ मार्च १९५९ च्या निकाल आणि आदेशातून उद्भवलेल्या फौजदारी अपील क्रमांक ४११/१९५९ मधील पूर्वीच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रकरण क्रमांक ५४/१९५२ मध्ये १९ आणि २० जून १९५९ च्या निकाल आणि आदेशावरून विशेष परवानगीने अपील.

अपीलकर्त्यांसाठी -- बी. एम. मिस्त्री, रविंदर नारायण, एस. एन. अँडले, जे. बी. दादाचंजी, रामेश्वर नाथ आणि पी. एल. वोहरा.

उत्तरवादींसाठी -- नूर-उद-दीन अहमद आणि आर. एच. ढेबर.

१८ नोव्हेंबर, १९६०. न्यायालयाचा निर्णय माननीय न्यायमूर्ती इमाम यांनी दिला.

इलाखा शहर दंडाधिकारी XX न्यायालय, माझगाव , मुंबई यांनी अपीलकर्त्यांना मुंबई प्रतिबंध कायदा १९४९ च्या उप कलम ६५ (बी), ६५ (एफ) आणि ६६ (बी) अन्वये दोषी ठरवले (ज्याला यापुढे कायदा संबोधले जाईल) . कलम ६५ (बी) अन्वये अपीलकर्ता क्रमांक १ याला ९ महिन्यांच्या सश्रम कारावासाची आणि १००० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. इतर कलमांखाली स्वतंत्र शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही. कलम ६५ (बी ) अन्वये अपीलकर्ता क्रमांक २ याला ६ महिन्यांच्या सश्रम कारावासाची आणि ५०० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. इतर

कलमांखाली स्वतंत्र शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही. त्यांनी त्यांच्या दोषसिद्धी आणि शिक्षेविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले. उच्च न्यायालयाने अधिनियमाच्या उप कलम ६५ (बी ) आणि ६६ (बी ) अन्वये त्यांची शिक्षा रद्द केली परंतु कलम ६५ (फ) सह कलम ८१ अन्वये त्यांची दोषसिद्धी, कलम १०३ पासून उद्भवलेल्या अपीलकर्त्यांविरुद्धच्या अनुमानावर विसंबून कायम ठेवली. त्यानुसार उच्च न्यायालयाने निर्देश दिले की इलाखा शहर दंडाधिकारी यांनी कलम ६५ (बी) च्या अन्वये अपीलकर्त्यांना तुरुंगवास आणि दंडाची जी शिक्षा सुनावली ती शिक्षा कलम ६५ (फ) सह कलम ८१ अन्वये तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा मानण्यात यावी .

अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार, २ ऑगस्ट १९५८ रोजी अपीलकर्ता क्रमांक १ च्या व्यावसायिक परिसरातील काही स्थळाचा खेतवाडीच्या १२ व्या गल्लीतील धुन हवेलीच्या तिसऱ्या मजल्यावर शोध घेण्यात आला. तेथे एक संपूर्ण सक्रिय भट्टी आढळली आणि दोन्ही अपीलकर्ते त्यावर काम करत होते. अपीलकर्ता क्रमांक २ मोटर पंपाने सिलिंडरमध्ये हवा भरत होता, तर अपीलकर्ता क्रमांक १ ने टाकीला जोडलेली रबर ट्यूब धरून ठेवली होती. तिथे एक लोखंडी स्टॅन्ड ज्यावर बॉयलर (बाष्पपात्र ) ठेवलेले होते हेही सापडले . बाष्पित्रच्या खाली एक स्टोव होता जो जळत होता. भट्टीजवळ एक मोठी बरणीही होती. अभियोग पक्षानुसार या मोठ्या बरणीमध्ये अवैध दारू होती. आणखी एका काचेच्या बरणीचा वापर धारक (रिसीव्हर) म्हणून करण्यात आला होता, ज्यात देखील अभियोग पक्षानुसार २० डरामस (drams) अवैध दारू होती. बॉयलरमध्ये चार गॅलन वॉश होते. वॉश भरून असलेले ११ लाकडी बॅरेल देखील तेथे होते. आवारातील हॉलमध्ये २० dram अवैध दारूचे काचेचे एक छोटे भांडे, १ ते १/२ ड्रॅम अवैध दारू असलेली एक बाटली आणि ३ ड्रॅम अवैध दारू असलेली पिंटची बाटली देखील सापडली. या वस्तूंच्या जप्तीबाबत एक पंचनामा तयार करण्यात आला होता. अभियोग पक्षाचे म्हणणे असे होते कि, अपीलकर्ते अवैध दारू तयार करत होते आणि त्यांच्या ताब्यात अंमली पदार्थ तयार करण्यासाठी आवश्यक असलेली भट्टी, इतर साहित्य होते आणि अवैध दारू देखील होती.

संशयित परिसरामध्ये एक सक्रिय भट्टी, काचेच्या बरणीमध्ये अवैध दारू आणि दोन बाटल्या सापडल्याने इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांचे समाधान झाले. उच्च न्यायालयाचे असे मत होते की तेथे एक सक्रिय भट्टी सापडली आहे, परंतु बाटल्या आणि काचेच्या बरण्या या पंचांच्या उपस्थितीत सीलबंद करण्यात आल्या आहेत हे समाधानकारकपणे सिद्ध न झाल्याने, संशयित परिसरात अवैध दारू सापडली आहे असे मानण्यासाठी या प्रकरणातील परस्परविरोधी आणि असमाधानकारक पुराव्यांवर

अवलंबून राहणे सुरक्षित ठरणार नाही. उच्च न्यायालयाने पुढे असे मत व्यक्त केले कि ज्या बाटल्या जप्त केल्या गेल्या होत्या आणि ज्या नमुन्याच्या बाटल्यांमध्ये वॉश होता, त्या रासायनिक परीक्षकाने तपासलेल्या बाटल्या होत्या, ज्याबाबत त्यांनी दंडाधिकाऱ्यांना अहवाल दिला होता, हे दाखवण्यासाठी अभिलेखावर कोणताही पुरावा नव्हता. त्यानुसार, (न्यायालयाचे) असे मत होते की उप कलम ६५ (बी ) आणि ६६ (बी ) अन्वये दोषसिद्धी होऊ शकत नाही.

अपीलकर्त्यांच्या वतीने अशी विनंती करण्यात आली होती की कायद्याच्या कलम १०३ अन्वये असे कोणतेही अनुमान लावू शकत नाही कारण उच्च न्यायालयाच्या निष्कर्षांवर असे सिद्ध झाले नव्हते की भट्टी हि कोणत्याही मादक पदार्थाच्या निर्मितीसाठी एक उपकरण होते जे सामान्यतः कोणत्याही मादक पदार्थाच्या निर्मितीमध्ये वापरले जाते. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की जेव्हा आरोपींची चौकशी केली गेली तेव्हा या संदर्भात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४२ अंतर्गत त्यांना कोणतेही प्रश्न विचारले गेले नाहीत आणि परिणामी त्यांना या अनुमानाला नकार देण्याची संधी नाकारण्यात आली होती. इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यांविरुद्ध कलम १०३ च्या तरतुदीचा वापर केला नव्हता, कारण त्यांना हे समजले होते की प्रत्यक्षात परिसरातून अवैध दारू जप्त करण्यात आली होती आणि भट्टी अशा मादक पदार्थांच्या निर्मितीसाठीच होती. जर इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांचा अपीलकर्त्यांविरुद्ध कलम १०३ अंतर्गत अनुमान वापरण्याचा हेतू असता तर ते त्यांना सदर बाब नाकारण्याची संधी देण्यास बांधील होते. जर अपील स्तरावर उच्च न्यायालयाचे असे मत होते की शोधमोहिमेच्या दरम्यान कोणतेही अवैध मद्य जप्त करण्यात आले आहे हे सिद्ध झाले नाही, तर अपीलकर्त्यांना त्याचे खंडन करण्याची संधी न देता, कलम १०३ अंतर्गत उद्भवलेल्या अनुमानावर त्यांनी अपीलकर्त्यांना दोषी ठरवायला नको होते. या प्रकरणात कलम ६५ (एफ) अन्वये ताडी व्यतिरिक्त इतर कोणतेही मादक पदार्थ तयार करण्याच्या उद्देशाने भट्टी किंवा उपकरण वापरणे, ठेवणे किंवा बाळगणे हा गुन्हा असेल. अपीलकर्ता क्रमांक १ याच्या ताब्यात असलेल्या आवारातून जप्त केलेली भट्टी किंवा उपकरणे अशी होती जी सामान्यतः ताडी तयार करण्यासाठी वापरली जात नाही, हे पुराव्यांवरून सिद्ध झाले नाही.

अपीलकर्ता क्र. २ च्या वतीने पुढे विनंती करण्यात आली की, भट्टी ताब्यात असल्याबद्दल किंवा कलम ६५ (फ ) सह कलम ८१ अन्वये म्हणजेच गुन्हा करण्यास प्रवृत्त करण्यासाठी कलम ६५ (फ ) अन्वये त्याला दोषी ठरवता येणार नाही . हा अपीलकर्ता केवळ अपीलकर्ता क्रमांक १

चा सेवक होता. हा अपीलकर्ता केवळ अपीलकर्ता क्रमांक १ चा सेवक होता. जर भट्टी कोणाच्या ताब्यात होती तर ती अपीलकर्ता क्र. १ च्या ताब्यात होती. आणि तसेही अपीलकर्ता क्रमांक २ याने अपीलकर्ता क्रमांक १ ला भट्टी ताब्यात घेण्यास प्रवृत्त केले होते हे दर्शविण्यासाठी कोणताही पुरावा नव्हता. अपीलकर्ता क्रमांक २ केवळ पंप वापरत होता, आणि शक्यतो त्याच्या मालकाच्या आदेशानुसार, आणि त्याच्या ताब्यात भट्टी आहे असे म्हटले जाऊ शकत नसल्यामुळे, या अपीलकर्त्याच्या विरोधात अधिनियमाच्या कलम १०३ च्या अंतर्गत कोणतेही अनुमान उद्भवू शकत नाही.

आपण प्रथम अपीलकर्ता क्रमांक २ चे प्रकरण हाताळू. त्याने त्याच्या मालकाला भट्टी ताब्यात घेण्यास कोणत्याही प्रकारे मदत केली याचा कोणताही पुरावा नाही. असे गृहीत धरणे योग्य ठरेल की जेव्हा तो पंप वापरत होता तेव्हा तो त्याच्या मालकाच्या आदेशानुसार असे करत होता आणि काय तयार केले जात होते याची त्याला कदाचित कल्पना नसेल. त्याच्या वर्तनामुळे कोणताही संशय उद्भवू शकतो. ती भट्टी त्याच्या ताब्यात होती असेही म्हणता येणार नाही. ती भट्टी त्याच्या मालकाच्या ताब्यात होती. तो केवळ आवारातील एक कर्मचारी होता आणि त्या वस्तू त्याच्या ताब्यात सोपविल्याशिवाय , त्याच्या मालकाच्या मालकीच्या वस्तू त्याच्या ताब्यात होत्या असे म्हटले जाऊ शकत नाही. आम्हाला असे वाटते की अपीलकर्ता क्रमांक २ च्या विरोधात जो काही संशय आहे त्यामुळे असे म्हटले जाऊ शकत नाही की हे वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध केले गेले आहे कि भट्टी अशा प्रकारे त्याच्या ताब्यात होती जो कायद्याच्या कलम ६५ (फ) च्या अंतर्गत गुन्हा ठरेल. अशा परिस्थितीत, कलम १०३ अंतर्गत त्याच्या विरोधात असा कोणताही अंदाज येऊ शकत नाही की त्याच्या ताब्यात भट्टी होती आणि त्याचे स्पष्टीकरण तो समाधानकारकपणे देऊ शकला नव्हता. त्यानुसार आम्ही अपीलकर्ता क्रमांक २ चे अपील मान्य करू आणि त्याची दोषसिद्धी आणि शिक्षा रद्द करू.

जिथपर्यंत अपीलकर्ता क्रमांक १ चा संबंध आहे , तिथे हा प्रश्न येऊ शकत नाही कि त्याच्या ताब्यात भट्टी सापडली, भट्टीचे जे स्वरूप पुराव्यांद्वारे उघड केले आहे ते लक्षात घेता, ती सामान्यतः दारूसारख्या मादक पदार्थाच्या निर्मितीसाठी वापरली जाते , यात शंका नाही. अभिलेखावर आढळलेल्या भट्टीच्या वर्णनाचा विचार करता, आमचे समाधान झाले आहे की संशयित भट्टीचा वापर सामान्यतः ताडीच्या निर्मितीसाठी केला जात नाही. खरे तर हे संशयास्पद आहे कि ताडी तयार करण्यासाठी कोणतीही भट्टी आवश्यक असते कारण एकतर ताडी आंबवलेली असते किंवा नसते. जर ताडी आंबवलेली

नसेल तर भट्टीची आवशकता नाही. दुसरीकडे, जर ताडी आंबवली असेल तर आंबवण्याची प्रक्रिया हि नैसर्गिक आहे आणि त्याच्यासाठी कोणत्याही उपकरणाच्या मदतीची आवश्यकता नसते. तथापि, असे

म्हटले जात होते की ताडी गरम केल्याने जास्त प्रमाणात आंबते आणि ती अधिक गुणकारी होते. मात्र, याबाबत आमच्याकडे अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. जरी आपण असे गृहीत धरले की ताडी गरम केल्यावर, जास्त प्रमाणात आंबते आणि त्यामुळे अधिक गुणकारी होते, परंतु हे साध्य करण्यासाठी गरम करण्याच्या प्रक्रियेसाठी वर उल्लेखित प्रकारची भट्टी आवश्यक आहे जी अपीलकर्ता क्रमांक १ च्या आवारात सापडली, हे दर्शविण्यासाठी काहीही उपलब्ध नाही.

तथापि, असे निदर्शनास आणून देण्यात आले की कायद्याच्या कलम १०३ मुळे उद्भवलेल्या अनुमानाला नकार देण्याची संधी देण्यासाठी अपीलकर्त्याला कोणतेही प्रश्न विचारले गेले नाहीत. तथापि, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की जेव्हा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४२ अंतर्गत अपीलकर्त्याला तपासण्यात आले तेव्हा त्याने स्वेच्छेने असे विधान केले होते की त्याला पोलिसांनी जप्त केलेल्या विविध निषिद्ध पदार्थांबद्दल माहिती नव्हती. या प्रकरणात त्याची ही वृत्ती असल्याने, त्यांच्या ताब्यात असलेल्या परिसरात सापडलेल्या भट्टी आणि इतर विविध वस्तूंचे स्पष्टीकरण देण्यासाठी त्यांना आणखी कोणते प्रश्न विचारले जाऊ शकत होते हे समजून घेणे कठीण आहे. या विशिष्ट प्रकरणात असे म्हणणे शक्य नाही की दंडाधिकारी अपीलकर्त्याच्या ताब्यात असलेल्या आवारात सापडलेल्या भट्टी आणि इतर वस्तूंविषयी कोणतेही विशिष्ट प्रश्न त्याला विचारण्यात अपयशी ठरल्यामुळे हा अपीलकर्ता पूर्वग्रहदूषित झाला होता.

कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत उद्भवणारी धारणा अशी आहे की, जर एखाद्या व्यक्तीकडे केवळ, पुढील पुराव्यांशिवाय, कोणत्याही मादक पदार्थाच्या निर्मितीसाठी कोणतीही भट्टी, भांडी, अवजारे किंवा उपकरणे आढळली, जी सामान्यतः अशा मादक पदार्थाच्या निर्मितीमध्ये वापरली जातात, तर ते उलट सिद्ध होईपर्यंत, कायद्यांतर्गत गुन्हा समजला जातो. हा विचार करणे कठीण आहे कि अपीलकर्ता ताब्यात असलेल्या परिसरात सापडलेली भट्टी आणि इतर वस्तू सामान्यतः ताडी तयार करण्यासाठी वापरल्या जाऊ शकतात, हे सिद्ध करण्यासाठी कोणताही समाधानकारक पुरावा देऊ शकला असता. त्यानुसार आमचे समाधान झाले आहे की, सध्याच्या खटल्याच्या परिस्थितीत, जेव्हा उच्च न्यायालयाने कायद्याच्या कलम ६५ (एफ) अन्वये अपिलकर्त्याची शिक्षा कायम ठेवण्यासाठी कलम १०३ अंतर्गत उद्भवलेल्या अनुमानावर भर दिला, तेव्हा अपीलकर्त्याबाबत कोणताही पूर्वग्रह नव्हता .

शिक्षा कमी करण्याची विनंती अखेरीस करण्यात आली. आमच्या मते, अधिनियमाच्या तरतुदींचा विचार करता दिलेली शिक्षा अनावश्यक गंभीर असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

त्यानुसार, अपीलकर्ता क्रमांक २ ने दाखल केलेले अपील मंजूर केले जाते आणि त्याची दोषसिद्धी आणि शिक्षा रद्द केली जाते परंतु अपीलकर्ता क्रमांक १ ने दाखल केलेले अपील फेटाळले जाते.

त्यानुसार याचिका निकाली काढण्यात आली.

<u>अस्वीकरण</u>

" या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल ".